महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
क्रमांक: एलईएन-३७८४/९७५/सीआर-३०३५-ग-३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: 6 ऑगस्ट, १९८८.

पहा :- १] विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडील क्रमांक महसूल-२-जमिन [ना] १२४२, दिनांक ९/४/८४ चे पत्र.

परिपत्रक:

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, नगरपालिका/महानगरपालिका हद्दीतील शासकीय जमिनीवर फार मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे होत आहेत. तसेच शासकीय जमिनीवर बांधकामासाठी जिल्हाधिकारी, नगरपरिषद, महानगरपालिका यांची कोणत्याही प्रकारे परवानगी घेण्यात येत नाही. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४३ अन्वये कोणत्याही नगर परिषद/महानगरपालिकांच्या हद्दीतील कोणत्याही जागेचा विकास करावयाचा झाल्यास त्यासाठी नियोजन प्राधिकरणांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. व जर अशा त-हेची परवानगी घेतली नाही तर त्याच अधिनियमाच्या कलम ५२ ते ५४ अन्वये तो दखलपात्र गुन्हा ठरतो. या कृतीस सदर अधिनियमातील तरतुदींनुसार शिक्षा/दंड दोन्हीही होऊ शकते. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये सुध्दा कोणत्याही शासकीय जमिनीचा विनियोग/वापर हा शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय करणे हे कृत्य नियमबाह्य आहे व त्यावरही त्या अधिनियमान्वये कार्यवाही होऊ शकते. तसेच शहराच्या विकास आराखड्यामध्ये शासकीय जमिनीचा उपयोग शाळा, दवाखाने, उद्याने, इत्यादीसारख्या सार्वजनिक उपयोगासाठी आरक्षित म्हणून दर्शविण्यात आला असण्याची शक्यता असते. अशा प्रकारे अधिनियमातील तरतुदीनुसार आरक्षणे दर्शविण्यात आली असतांना सुध्दा शासकीय जमिनीवरील अतिक्रमणांची संख्या दिवसें दिवस वाढत आहेत. तसेच काही ठिकाणी सदरहू जमिनीवर नगर परिषद/महानगरपालिका यांनी बांधकाम परवानगी दिल्या असल्याचे सुध्दा शासनाच्या निदर्शनास आले आहे. कोणतीही शासकीय जमीन ही जोंपर्यन्त शासन व्यक्ती/संस्था यांना त्यांच्या वापरासाठी अधिकृतरित्या प्रदान केली जात नाही तोपर्यन्त

कृ. मा. प.

RB
ely

शासनाच्या मालकीच्या जमिनीवर, खाजगी व्यक्तींना/संस्थांना बांधकामासाठी परवानगी देता येणार नाही व अशा प्रकारचे बांधकाम केल्यास ते बांधकाम अवैध ठरविण्यात येईल.

२. परिच्छेद १ मधील सर्व गोष्टी विचारात घेतल्यानंतर शासन [illegible] सूचना देत आहे की, सर्व महानगरपालिका/नगरपालिका यांनी कोणत्याही शासकीय जमिनीवर बांधकाम विषयक परवानगी देण्यापूर्वी, सदरहू जमीन ही विकास आराखड्यात सार्वजनिक उपयोगासाठी राखून ठेवलेली नाही व ती जागा अर्जदार व्यक्ती/संस्थांना शासनाने अधिकृतरित्या दिली आहे. याची खात्री करुन घेऊन व अर्जदार व्यक्ती/संस्थांना, सदरहू जमिनीच्या वापराबाबत नगररचना व मुल्यनिर्धारण विभागाच्या शाखाधिकारी यांचेकडून शहानिशा करुन घेतली आहे हे पाहून मगच परवानगी देण्याचा विचार करावा. कोणतेही बिगर परवाना बांधकाम हे अतिक्रमणाचे नियमबाह्य कृत्य ठरविले जाऊन महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये संबंधित व्यक्ती वा संस्था कायदेशीर कार्यवाहीस पात्र ठरतील. तसेच अशा त-हेने केलेले अतिक्रमण वा बेकायदेशीर बांधकाम नियमित केले जाणार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी. पक्के बांधकाम करण्याकरिता परवानगी देण्यापूर्वी संबंधीत व्यक्तिच्या नावें त्या जमिनीचे सर्व हक्क आहेत किंवा नाहीत याची खात्री करुनच घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

[ र. रा. पाठक ]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,